हिंदूसंघटन आणि हिंदु राष्ट्राच्या स्थापनेसाठी कार्यरत

# हिंदु जनजागृती समिति

नोंदणी क्र. : 1540/I-634, १२.११.२००२, फोंडा, गोवा.

भ्रमणध्वनी
०९३२६१०३२७८
ई-मेल
contact@HinduJagruti.org
संकेतस्थळ
www.HinduJagruti.org

नोंदणीकृत कार्यालय : 'मधु स्मृति', घर क्र. ४५७, पहिला मजला, बैठक सभागृह, सत्यनारायण मंदिराजवळ, ढवळी, फोंडा, गोवा ४०३ ४०१.

दिनांक : 3.7.2017

**कृपया प्रसिद्धीसाठी**

**श्री तुळजाभवानी मंदिर भ्रष्टाचार प्रकरण : न्यायालयाने शासनावर अप्रसन्नता व्यक्त केली !**

## छत्रपती शिवरायांच्या 'शिवशाही'चा आदर्श मिरवणारे महाराष्ट्र शासन आई तुळजाभवानी मंदिर लुटणाऱ्यांना पकडण्यात विलंब का करत आहे ?

### संपूर्ण प्रकरणाचा तपास येत्या ३ मासांत पूर्ण करण्याचे हमीपत्र पोलीस उपमहासंचालक सादर करणार

श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानमध्ये वर्ष १९९१ ते २००९ या १९ वर्षांच्या कालावधीत दानपेटीचा लिलाव करतांना चुकीच्या आणि खोट्या नोंदी दाखवून संस्थानचे कोट्यवधी रुपये लुबाडले, दानपेटी घोटाळ्यात देवस्थानचे १२० किलो सोने, २४० किलो चांदीची लूट झाली, यासह संस्थानची २६५ एकरची जमीनही हडप केली, तरीही छत्रपती शिवरायांचा आदर्श सांगून 'शिवशाही' शासन म्हणून मिरवणाऱ्या महाराष्ट्र शासनाला आई तुळजाभवानीची संपत्ती लुटणाऱ्यांना पकडण्यासाठी इतका विलंब का लागत आहे, असा प्रश्न हिंदु जनजागृती समितीचे राज्य संघटक श्री. सुनील घनवट यांनी केला. श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानमध्ये झालेल्या भ्रष्टाचार प्रकरणी मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपिठामध्ये ३० जून यादिवशी सुनावणी झाली, या वेळी मा. मुख्य न्यायमूर्ती मंजुळा चेल्लूर आणि मा. न्यायमूर्ती आर.एम. बोर्डे यांच्या द्विसदस्यीय खंडपिठाने पोलीस उपमहासंचालक (गुन्हे अन्वेषण विभाग) यांना याविषयी कडक शब्दांत विचारणा केली, तसेच संथगतीने चाललेल्या अन्वेषणाविषयी अप्रसन्नता दर्शवली. यावर 'या प्रकरणाचा संपूर्ण तपास येत्या ३ मासांत पूर्ण करू', असे राज्याचे पोलीस उपमहासंचालकांनी न्यायालयात सांगितले, तसेच याविषयीचे हमीपत्र १४ जुलैपर्यंत सादर करण्यास न्यायालयाने सांगितले.

याविषयी बोलतांना श्री. घनवट म्हणाले की, या प्रकरणात २१ जिल्हाधिकारी आणि अन्य विश्वस्त यांनी संगनमताने वरील अपहार केला आहे. याविषयी वर्ष २०१५ मध्ये १५ आमदारांनी विधीमंडळात आवाज उठवला आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'या प्रकरणाचा तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे (सीआयडी) सुपूर्द केला असून ती चौकशी चालू आहे आणि ती लवकरच पूर्ण होईल', असे उत्तरही दिले होते. मात्र सध्या संबंधित अधिकारी हेच उच्चपदस्थ अधिकारी आणि अन्य विश्वस्त राजकीय नेते झाले असल्याने ही चौकशी रेंगाळली आहे. म्हणूनच आम्ही या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. आजवर राज्य शासनाने ज्या ज्या मंदिरांचे सरकारीकरण केले, त्या त्या मंदिरांमध्ये भ्रष्टाचाराने कळस गाठला आहे. दुर्दैवाने हिंदुत्ववादी शासन केंद्रात आणि राज्यात सत्तेत येऊनही हिंदूंची मंदिरे मात्र अजूनही या दुष्ट चक्रात अडकली आहेत. मात्र शासनाने हे ध्यानात ठेवावे की, मंदिरांचा पैसा लुबाडण्याचे पाप करणारे आणि त्यांना संरक्षण देणारे दोघेही पापाचे धनीच असतात. या पापी शक्तींना आई तुळजाभवानी योग्य तो शिक्षा करेल, अशी आमची श्रद्धा आहे. राज्यातील मंदिरे ही लवकरच भ्रष्टाचारमुक्त होण्यासाठी सरकारीकरणमुक्त होणे आवश्यक असल्याचे मत श्री. घनवट यांनी या वेळी व्यक्त केले. या सुनावणीच्या वेळी समितीच्या वतीने हिंदु विधीज्ञ परिषदेचे अधिवक्ता सुरेश कुलकर्णी, अधिवक्ता पंकज गायकवाड आणि अधिवक्ता उमेश भडगावकर यांनी काम पाहिले.

आपला नम्र,

सुनील घनवट

श्री. सुनील घनवट,
राज्य संघटक, हिंदु जनजागृती समिती, महाराष्ट्र. (संपर्क : 9404956534)